# पाठ ९

# पुस्तिका ८

# स्थापन केलेली मंडळे, परिषद, समित्या व इतर मंडळे यांचे विवरणपत्र

स्थापन केलेली मंडळे, परिषद, समित्या व इतर मंडळे यांचे विवरणपत्र

विकास नियोजन खात्याच्या संदर्भात येथे नमूद करण्यात येते की, संकृती वारसा इमारती, सुती कापडगिरण्यांच्या जमिनीचा विकास व उंच इमारती यांच्याशी संबंधित प्रस्तावांची छाननी करण्याकरिता व यासंदर्तात प्रशासनाला सल्ला देण्याकरिता विविध समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. पुरातन वास्तू जतन समिती

| | |
|---|---|
| संलग्न मंडळाचे नाव व पत्ता | मुंबई संस्कृती-वारसा जतन समिती, ही समिती प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्या कार्यालयात, महापालिका उपवास्तुशास्त्रज्ञ (विकास नियोजन) यांच्या नियंत्रणाखालील संस्कृती वारसा विभागामार्फत , महानगरपालिका मुख्यालय 6 वा मजला, मुख्य इमारत महापालिका मार्ग, मुंबई येथे कार्य करते. |
| संलग्न मंडळाचा प्रकार | समिती |

| | |
|---|---|
| संलग्न मंडळाचा थोडक्यात परिचय | राज्यशासनाने दि.21 एप्रिल, 1995 च्या क्र. डीसीआर / 1090 / 3197 / आरडीपी / युडी - 11 अन्वये विकास नियंत्रण नियमावली क्र.67 मंजूर केले. सदर नियमावली, यादी केलेल्या संस्कृती वारसा इमारतींचे व ऐतिहासिक प्रतीमा) जतन करण्यासंबंधी आहे. राज्यशासनाने संस्कृती वारसा जतन समिती सुरुवातीला सन 1995 मध्ये नेमली. ही समिती हानगरपालिका आयुक्तांना वि.नि.नि. 1991 च्या नियम 67 मध्ये वर्णन केलेल्या संस्कृती वारसा जतन संबंधी विविध विषयांवर सल्ला देते. |
| संलग्न मंडळाची भूमिका | महानगरपालिका आयुक्तांना सल्ला देते |
| मंडळाचे प्रमुख | समितीचे अध्यक्ष हे समितीचे मुख्य आहेत. |

| | |
|---|---|
| मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा | ही समिती प्रमुख अभियंता (वि.नि.) यांच्या कार्यालयातून महापालिका ऊपवासतुशास्त्रज्ञाच्या संस्कृती-वारासा जतन विभागामार्फत काम पहाते. त्यांचे कार्यालय महापालिका मुख्यालय, 6वा मजला, मुख्य इमारत, मुंबई महापालिका मार्ग, मुंबई येथे आहे |
| बैठक किती वेळा असते? | महिन्यातून दोन वेळा |
| बैठकीत जनता सहभागी होऊ शकते का? | नाही |
| बैठकीचा कार्यवृत्तांत तयार केला जातो का? | होय |

सुती कापड गिरण्या संनियंत्रण समिती

| | |
|---|---|
| संलग्न मंडळाचे नाव व पत्ता | सुती कापड गिरण्या संनियंत्र समिती (Textile Monitoring Committee) |

| | |
|---|---|
| | सदर समिती प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्या कार्यालयातून काम पहाते. सदर कार्यालय, महापालिका मुख्यालय, 4था मजला, मुख्य इमारत, मुंबई महानगरपालिका मार्ग, मुंबई |
| संलग्न मंडळाचा प्रकार | समिती |
| संलग्न मंडळाचा थोडक्यात परिचय | अद्ययावत सुधारित वि.नि.नि.1991 चा नियम क्र.58 सुती कापड गिरण्यांच्या विकासासंबंधी आहे. नियम 58 (9) मध्ये अंतभूत असलेल्या तरतुदींनुसार, शासनाच्या दि.24 डिसेंबर 2001 च्या व नंतर दि.19 मे, 2003 च्या ठरावानुसार संनियंत्रण समिती स्थापन केली गेली. समितीची पहिली बैठक दि.14 जानेवारी, 2002 रोजी झाली आणि आजपर्यंत 56 बैठका झाल्या. |
| संलग्न मंडळाची भूमिका | संनियंत्रण समितीची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.<br>1) सुती कापड गिरण्यांकडून बांधकामव्याप्त जागा, मोकळया जागा व उर्वरित चटई क्षेत्र शांकाची पारदर्शक विक्री व्हावी म्हणून मार्गदर्शक तत्वे तयार करणे |

| | |
|---|---|
| | 2) एस्क्रो लेखा (ESCROW) उघडणे, चालविणे व बंद करणे याकरिता मार्गदर्शक तत्वे तयार करणे |
| | 3) एस्क्रो निधी काढून घेण्याकरिता व अर्जाकरिता प्रस्ताव मंजूर करणे |
| | 4) सुती कापड गिरण्यांच्या संदर्तात गृहनिर्माण, पर्यायी रोजगार व कामगारांचे प्रशिक्षण यासंबंधी या नियमावलीच्या तरतुदीच्या अंमलबजावणीची पाहणी करणे. |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा | सदर समिती प्रमुख अभियंता (वि.नि.) यांच्या कार्यालयातून महापालिका मुख्यालय, 4 था मजला, मुख्य इमारत, मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई येथून काम करते. |
| बैठक किती वेळा होते | महिन्यातून एकदा |
| बैठकीत जनता सहभागी होऊ शकते का | नाही |
| बैठकीचा कार्यवृत्तांत तयार केला जातो का | होय |

# उंच इमारतीची विकास समिती

| | |
|---|---|
| संलग्न मंडळाचे नाव व पत्ता | उंच इमारतीच्या विकास प्रस्तावांची छाननी करण्याकरिता तांत्रिक समिती, सदर समिती प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्या कार्यालयातून काम पहाते.  हे कार्यालय महापालिका मुख्यालय, 4 था मजला, मुख्य इमारत, मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई येथे आहे. |
| संलग्न संस्थेचा प्रकार | समिती |
| संलग्न संस्थेचा थोडक्यात परिचय | पायाभूत सुविधा व पर्यावरण यावर उंच इमारतींचा होणारा एकूण परिणाम अभ्यासण्याकरिता शासनाच्या नगर विकास खात्याने दि. 28 जुलै 2004 च्या शासन ठराव क्र.टीपीबी / 4303 / 49 / सीआर - 4 / 03 यूडी - 11 अन्वये, उंच इमारतींच्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता या क्षेत्रातील तज्ञांची समिती नेमली आहे. |
| संलग्न संस्थेची भूमिका | महानगरपालिका आयुक्तांना सल्ला देणे |

| | |
|---|---|
| मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा | सदर समिती प्रमुख अभियता (वि. नि.) यांच्या कार्यालयातून महापालिका मुख्यालय, 4 था मजला, मुख्य इमारत, मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई येथून काम करते. |
| बैठक किती वेळा होते? | महिन्यातून एकदा |
| बैठकीत जनता सहभागी होऊ शकते का? | नाही |
| बैठकीचा कार्यवृत्तांत तयार केला जातो का? | होय |